क्रमांक : ३८८१ /क-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२३

**विषय :- या सचिवालयातील अद्यापपर्यंत नोंदणी न केलेले अधिकारी / कर्मचारी तसेच तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असलेले कर्मचारी यांची बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीकरीता नव्याने नोंदणी करण्याबाबत**

**संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक २३८०६/क-१, दि. ३० नोव्हेंबर, २०२२**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये कार्यालयातील उपस्थितीची नोंद करण्याकरिता नव्याने बायोमेट्रिक यंत्रणा स्थापित करण्यात येत असून त्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी यांची नव्याने नोंदणी करण्यासाठी दिनांक ०१ ते ०८ डिसेंबर, २०२२ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत नोंदणीसाठी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि, अद्यापही काही अधिकारी व कर्मचारी (कार्यरत असलेले तात्पुरते कर्मचारी यांच्यासह) यांनी नवीन बायोमेट्रीक यंत्रणेसाठी नोंद केलेली नाही. त्यांच्यासाठी गुरुवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ व शुक्रवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत कक्ष क्रमांक १४०३, चौदावा मजला, विधानभवन, मुंबई येथे नोंदणी व छायाचित्र काढण्यात येणार आहे.

यानुषंगाने उपरोक्त कालावधीत नोंदणी करण्याकरिता उपस्थित रहावे तसेच यानंतर सदर सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मोहन काकड

**(मोहन काकड)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) सर्व मा.समिती प्रमुख यांचे कार्यालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१०) क-२ संगणक कक्ष

११) निवडनस्ती.